Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# शाश्र्वत कृषी विकासात प्रसार माध्यमांची भूमिका

सुधीर भटकर, विनोद निताळे ,गोपी सोरडे

जनसंवाद आणि पत्रकारिता ,विभाग ,उमवि ,जळगाव .

गोषवारा

कृषीच्या विकासाकरिता मागील अनेक वर्षापासून नानविध प्रयोग व प्रयत्न केले जात आहे . कृषी विकासाच्या प्रयत्नातूनच शाश्वत कृषी विकासची संकल्पना पुढे आली . भारतीय अर्थव्यवस्थवस्थेला कृषीच्या शाश्र्वतेवर अवलंबून आहे . शेतर्कयांचे वाढते आत्महत्येचे प्रमाण थांबविणे आणि अन्नधान्याच्या वाढत्या किमती कमी करायच्या असतील तर प्रसार माध्यमांच्या मदतीने कृषिसंवाद घडवून आणणे गरजेचे आहे . त्याचबरोबर कृषी शिक्षण संशोधन व विस्तार यात सुधारणा घडवून प्रसार माध्यमांच्या द्वारे ते सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे . कृषी विषयक कार्यक्रम सर्वसामान्याला समजेल रूचेल व पटेल या स्वरूपात त्याचे सादरीकरण व आशयाची मांडणी करणे ग्रजेचे आहे .

कृषी शिक्षण व संशोधनास स्थानिकतेची जोड देणे गरजेचे आहे . प्रसारमाध्यमात या स्थानिक संशोधनाचे सचित्र चित्रण व सादरीकरण होणे तेवढेच गरजेचे आहे . शास्वत कृषी विकास संवादत प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे . प्रसार माध्यमांच्या मदतीने प्रत्यक्ष शेती करणारा शेतकरी व त्यावर आधारीत प्रत्येक घटक कृतीज्ञान संपन्न होणे तेवढेच गरजेचे आहे . वर्तमानपत्रे या दृष्टीकोनातून प्रयत्न करताहेत . इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे देखील त्यांच्या उपलब्धतेनुसार कृषीज्ञानाचे प्रसारण व जागृती विषयक संदेश वहन विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून करित आहे . आशय व सादरीकरणात बदल घडून आल्यास शाश्र्वत कृषीची संकल्पना र्खया अर्थाने संवादित होईल .

**Key words -**

शाश्र्वत कृषी संवाद़ प्रसारमाध्यम़ कृषीशिक्षण व विस्ताऱ संशोधऩ जनजागृती़ शेतकरी आत्महत्या .

## प्रस्तावर्ना

कृषीच्या विकासाकरिता मागील अनेक वर्षापासून नानाविध प्रयोग व प्रयत्न केले जात आहे . या प्रयत्नांना काही अंशी यश तर काही ठिकाणी अपयश येत असल्याचे दिसून येते . शेतीवर वाढता बोजा व उत्पादनात होणारी घट़ सोबतीला नैसर्गिक संकटे यातून हवालदिल झालेला शेतकरी आत्महत्येच्या मार्गावर येवून पोहचला . महाराष्ट्रातच नाही तर देशभर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते . शेतीचे पध्दतीने नियोजन व झाल्यास शेती करणे दूरास्त होण्याचे चिन्ह दिसून येत आहे . परिणामी शेतकरी ही संकल्पना इतिहास जमा होण्याची शक्यता नाकारता येत नाही . अन्न आधण्याच्या वाढत्या किमती सर्वसामान्यांचे जगण्याचे प्रश्न अधिक गुंतागुंतीच्या करताहेत . कृषी विकास व संवर्धनाबाबत आज निर्माण प्रश्नांनी शेतकरी व सर्वसामान्यांना हैराण करून सोडले आहे . शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे . हाच निकामी झाला तर संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडेल . भक्कम अर्थव्यवस्था व समृध्द भारत निर्माणासाठी शेतीला शाश्र्वत विकासाची जोड देणे ग्रजेचे आहे . शाश्र्वत विकास संवादातून शेतीला समृध्दता व पर्यायाने देशाला समृध्दता प्राप्त होईल . हा शाश्र्वत कृषी विकास संवाद प्रसार माध्यमांच्या मदतीशिवाय अपूर्ण आहे . या शाश्र्वत विकासात प्रसार माध्यमांच्ओ भूमिका त्या अनूषंगानेच तपासणे गरजेचे आहे .

## कृषी विकास संवादाचे स्वरूर्प

शाश्र्वत कृषी विकास संवाद ही संकल्पना समजून घेण्यासाठी कृषी विकास संवाद ही संकल्पना अभ्यासणे गरजेचे आहे . प्रसार माध्यमांच्या अनुषंगाने विचार करता़ प्रसार माध्यमातून ह्यवर्तमानपत्रे टि . व्ही ; रेडिओ़ इंटरनेटह्व कृषी विकासाच्या अनुषंगाने प्रसारीत़ प्रकाशित़ प्रक्षेपीत झालेला संदेश म्हणजे कृषी विकास संवाद होय . शेती विकासाच्या अनुषंगाने प्रसार माध्यमातून वेळोवेळी माहितीचे वहन केले जाते . ही माहिती कधी विकासाभिमूख तर कधी केवळ माहिती वजा अशा स्वरूपाची असते . प्रसारामाध्यांचा जनमानसांवर मोठा पगडा आहे . त्यातील आशय हा परिणामकारक असतो . हा परिणाम सकारात्मक किंवा नकारात्मक देखील असू शकतो . प्रसारमाध्यमे

**Please cite this Article as :** सुधीर भटकर, विनोद निताळे ,गोपी सोरड़े , शाश्र्वत कृषी विकासात प्रसार माध्यमांची भूमिका: **Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

जनमानसांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात . “The mass media play very significant role in shaping our perceptions of reality”[1] आहुजा व छाबरा यांचे वक्तव्य प्रसारमाध्यमांचे गुण वैशिष्टये निर्देश करणारे आहेत . त्यामुळे प्रसार माध्यमांद्वारे कृषी विकास संवादाची रूपरेषा कशा पध्दतीची आखली जाते ते बघणे गरजेचे आहे .

कृषी क्षेत्रात जे काही घडते ते सर्वच कृषी संवादाचे अंग ठरते . कृषी विषयक बातम्या असे त्याला प्रसारमाध्यमात स्वरूप असते . शेती विषयक पत्रकारितेच्या माध्यमातून कृषी संवाद मराठी प्रसार माध्यमातून चांगल्या पध्दतीने साधला जात आहे . या संदर्भात य . च . म . मु . विद्यापीठाच्या पुस्तीकेत नमुद केले आहे की “शेतीविषयक पत्रकारिता मराठी चांगली विकसीत झाली . जिल्हा तसेच प्रादेशिक वृत्तपत्रे शेतीशी संबंधीत बातमीला आवर्जून प्राधान्य देतात .”[2] भारतात पत्रकारितेला 1780 मध्ये सुरूवात झाली . ब्रिटीशांच्या राज्यात सुरू झालेली वर्तमानपत्रे ही निश्चितचइंग्रज धाटणीची होती . ईस्ट इंडिया कंपनीतील एक कर्मचारी जेम्स आगस्ट हिकी याने “भारतात सर्वप्रथम बंगाल गॅझेट किंवा कलकत्ता जनरल अॅडव्हायझर या नावाने साप्ताहिक 29 जानेवारी 1780 मध्ये सुरू केले .”[3] तर महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर यांनी सर्वप्रथम मराठी भाषेत वृत्तपत्र काढले .”[4] भारतीय पत्रकारितेचा कृषी विकास संवादाच्या दृष्टीकोनातून विचार करता लक्षात येते की सुरूवातीला भारतीय स्वातंज्य लढयात वर्तमानपत्रे सर्वर्थाने गुंतली होतो . देश स्वतंत्र हा त्यावेळच महत्वाचा प्रश्न होता . स्वातंज्य संग्रामात देखील सर्वप्रथम महात्मा फुले यांनी 'शेतर्कयाचा आसूड या ग्रंथात शेती व शेतर्कयांचे प्रश्न या विषयी सविस्तर विवेचन केले आहे . शेतर्कयांच्या प्रश्नांवर महात्मा फुलेंनी सर्वप्रथम पुस्तकाच्या माध्यमातून कृषी संवाद साधल्याचे दिसून येते . सत्सार या अल्पकाळ चालवलेल्या पत्रात महात्मा फुलेंची शेतर्कयांविषयीची तळमळ दिसून येते . या विषयी डॉ . धारूरकर म्हणतात “शपतर्कयांची दुःखे 114 वर्षापूर्वी महात्मा फुले यांनी प्रथम मांडली .”[5] लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी या वृत्तपत्राच्या माध्यमातून देखील शेतर्कयांचे प्रश्न मांडण्याचे कार्य केले आहे . महात्मा गांधी डॉ . बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्रीय नेत्यांनी देखील आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कृषी संवादाची पुढे विकसीत केल्याचे दिसून येते .

ब्रिटीश सरकार भारतीय शेती प्रश्न विषयी सजग नव्हते . आज लोकसंख्या वाढीमुळे शेतीप्रश्न अधिक बिकट झाल्याचे आपण म्हणतो परंतु इंग्रजांच्या काळापासूनच हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होत गेल्याचे दिसून येते . या संदर्भात रमेश पाध्ये म्हणतात 'भारतात अन्नधान्याचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असणे हा काही नवीन आजार नाही . ढोबळ मानाने सांगायचे तर विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून म्हणजे इंग्रज राजवटीच्या उत्तरार्धात भारताची लोकसंख्या झपाटयाने वाढू लागली आणि वाढत्या लोकांची भूक भागवण्यासाठी भारतातील शेतीक्षेत्र असमर्थ ठरू लागली .”[6] पुढे जावून ते असे म्हणतात “भारताच्या शेती क्षेत्राच्या विकासासाठी आर्थिक गुंतवणूक करण्याची त्यांची तयारी नव्हती . त्यामुळे स्वातंज्याची पहाट उगवेपर्यंत भारतात शेतीक्षेत्राच्या विकासाला सुरूवात झाली नाही .”[7] स्वातंज्यप्राप्तीनंतर कृषी विकासाच्या अनुषंगाने पावले उचलेली गेली . “भारताने नियोजनबध्द आर्थिक विकासाला सुरूवात केल्यानंतर म्हणजेच 1950 ते 1971 या काळात वर्षाला सुमारे 3 टक्के दराने कृषी उत्पादन वाढत गेले .”[8] कृषी तंत्रज्ञान व तंत्रविज्ञानाचे शिक्षण घेतलेले मनुष्यबळ यांचा सुरूवातीला वणवा असल्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली नाही .

कृषीचे प्रगत तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रसारमाध्यमे देखील बाल्य अवस्थेत होती . वर्तमानपत्र शिक्षित वर्गासाठी आणि कृषीशी प्रत्यक्ष निगडीत घटक साक्षरतेच्या प्रश्नांशी लढणारा होता . अशा परिस्थितीत वर्तमानपत्राच्या माध्यमातून कृषी संवाद साधणे असमर्थच ठरणार . दूरचित्रवाणी व रेडिओ ही माध्यमे यावेळी उपयोगी ठरणारे .” भारतात दूरचित्रवाणीचे 1959 मध्ये प्रक्षेपण सुरू झाले तर नभोवाणीचे खाजगी ट्रान्समिटरच्या माध्यमातून इ . स . 1927 मध्ये प्रसारण सुरू झाले .”[9] सुरूवातीच्या काळात ही माध्यमे कमणूकीचे माध्यम म्हणून ओळखली जायची . रेडिओ या माध्यमांची स्वातंज्यप्राप्तीनंतर कृषी संवादास चांगली गती दिली . भारतीय रेडिओच्या कृषी संवादातील भूमिके संदर्भात डॉ . धारूरकर म्हणतात “कृषी संशोधन विस्तार हे आकाशवाणीचे कार्य अधिक रचनात्मक स्वरूपाचे आहे . केरळमध्ये रेडिओ राईस ही तांदूळाची प्रगत जात प्रसारणातून घडलेल्या शेती शिक्षणातून विकसीत झालीळ आहे .”[10] आकाशवाणीच्या तुलनेत दूरदर्शनला कृषी संवादात विशेष योगदान देता आले नाही . “भारतासारख्या कृषी प्रधान देशात मात्र दूरचित्रवाणीकडे या दृष्टीने एक उपयुक्त व पूरक माध्यम म्हणून पाहिले जात नाही .”[11]

कृषी विकास संवादाचे स्वरूप बघता लक्षात येते की प्रसारमाध्यमांचे सुरूवातीच्या काळातील योगदान हे अल्पशः प्रमाणावर होते . अल्पशा जरी असले तरी त्यांचे योगदान सर्वश्रृत आहे . प्रसारमाध्यमांच्या मर्यादा व त्यांचा वापर करर्णायांची भूमिका या देखील माध्यमांच्या गुणवत्तेचा लेखा जोखा करतांना तपासाव्या लागतील . भारतात अमेरिकन कृषीशास्त्रज्ञा लॉरमन बोरोलॉग यांनी गव्हाचे विक्रमी उत्पादन देर्णाया नव्या संकरित जाती निर्माण करणारे तंत्रज्ञान विकसित केले होते . त्याचा लाभ उठवीत भारताने मेक्सिको या देशातून गव्हाचे भरघोस उत्पादन देणारे बियाणी मोठया प्रमाणावर आयात करून हरितक्रांतीचे रोप भारतात लावले .”[12] देशात हरितक्रांतीचे तंत्रज्ञान सर्वदूर पोहचविण्यासाठी कृषी विस्तारकांचे जाळे निर्माण करण्यात आले . या तंत्रज्ञानाविषयी माहिती व जागृतीचे कार्य प्रसारमाध्यमांमुळेच शक्य झाले हे विसरता कामा नये .

संकल्पर्ना शाश्वत कृषी विकार्स

विकास म्हणजे उन्नती वाढ़ वृध्दी प्रगती होय विकास या शब्दातून वाढ व वृध्दीयाचाच बोध होतो . त्यामुळे विकास हा उत्पादन वाढीशी संलग्नीत असल्याचे दिसते . “उत्पादनवाढ (Growth) म्हणजे विकास अशी उत्पादनवाढी (Productivisit) संकल्पना आज प्रभुत्वस्थायी आहे . जणू तीच एकमात्र विकासाची संकल्पना असल्याचा आभास केला जातो आहे .”[13] विकास हा अर्थकारणाशी अधिक जोडल्यामुळे त्याचा आशय हा मर्यादित झाला आहे . दिलीप कुलकर्णी वेगळया विकासाचे वाटाडे या पुस्तकात म्हणतात 'विकासाची सध्याची वाट आपल्याला विनाशाकडे नेणारी आहे प्रचलीत प्रतिमान हे अशास्वत विकासाचे आहे ह्या विकासात अंतर्ग त विरोध आहे . जेवढा अधिक विकास होईल तेवढा तो अधिक अशास्वत होतो . जेवढा अमर्याद तो करू पाहावा तेवढा तो संकुचित होतो . जितक्या अधिक वेगाने ते करू पहावा तितका अधिक लवकर तो संपुष्टात येतो'[14] तेव्हा प्रचलित विकासाचे प्रतिमान बदलवून शाश्वत विकासाचे प्रतिमान रूजविणे ग्रजेचे आहे . विकासाचे घटक निश्चित करतांना त्यात शाश्वत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे . या विषयी दत्ता देसाई म्हणतात “आजवरच्या विकासाच्या समीक्षेतून विकासमार्गाकिडे जाण्याच्या प्रकियेचा एक अर्थच महाराष्ट्रातील माणसांमध्ये नवा आशावाद जागवणे हा आहे . हे ज्यामुळे होवू शकेल अशा जागृतीच्या संगर्षाच्या आणि हस्तक्षेपाच्या जागा शोधून लोकांना संघटीत व कियाशील होण्यासाठी त्या खुल्या करणे हाही त्याचाच अर्थ आहे .”[15] जनमाणसात नवा आशावाद हा शाश्वत विकासातूनच साध्य होणार आहे . शाश्वत विकास या संकल्पनेचा अर्थ चिरस्थायी बदल असा आहे . हा चिरस्थायी किंवा निरंतर बदल सर्वांना अपेक्षित व मान्य असणे तेवढेच गरजेचे आहे . शाश्वत विकासाला पर्यायी विकास असे ही संबोधीतात . ज्याचा अर्थ विकास या संकल्पनेतून जे प्रश्न निर्माण झाले ते पुन्हा होवू नये या करिता निवडलेले पर्यायी स्वरूप . विकासाने वर्तमान काळातील लोकांचे प्रश्न साडविण्यास मदत केली त्याच बरोबर काही प्रश्न दखील निर्माण झाले . निर्माण झालेल्या प्रश्नांचे स्वरूप इतके भयावह आहे की त्याच्यातून भावी पिढीचा विनाश निश्चित आहे . आपली भावीपिढी सुरक्षित राहावी आणि वर्तमानपीढीला विकासाचे फळे चाखायला मिळावे या दुहेरी उद्देशा करिता जे प्रयत्न केले जातात ते म्हणजे शाश्वत विकासाचे भाग होय . भारत में ग्रामीण विकास या पुस्तकात रामजी यादव यांनी शाश्वत विकास या शब्दाला निर्वहन योग्य विकास असे नाव दिले आहे . ते म्हणतात “हमने जो विकास प्रकिया तय की है क्या यह निर्वहन योग्य हैं | यह मुद्दा हमारी उस कुशलता से बहुत ज्यादा जुडा है | जिससे हम प्राकृतिक साधनों का उपयोग करते है | साधनो का बडे पैमाने पर दुरूपयोग होने से केवल वर्तमान पीढी को ही नुकसान नही होंगा उससे कही

ज्यादा नुकसान आनेवाली पिढीयों को होंगा"16 तर शाश्वत विकास ही संकल्पना माध्यमअंचे अंतरंग या पुस्तकात मांडतांना लेखक म्हणतात "शाश्वत विकास म्हणजे या अर्थाने एक संतुलन आहे. नैसर्गिक संपत्ती पर्यावरण यांचा वापर तांत्रिक विकासासाठीच्या गुंतवणूकीसाठी दिशा या तत्वाचे त्यात संतुलन साधले जाते"17 शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरण रक्षणआच्या जागृती मधून पुढे आली आहे. विकासाच्या नावाखाली मोठया प्रमाणावर होणारे पर्यावरणाचे नुकसान शाश्वत विकासाची नोंदी ठरली. पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती व शाश्वत विकास हेच दोन पर्याय मांडण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन होईल अशा पध्दतीने वेगवेगळया क्षेत्रात झालेला सर्वमान्य बदल व प्रगती म्हणजे शाश्वत विकास होय. पर्यावरणाच्या र्‍हासाला परिणाम शेतीवर दखील जाणवू लागला. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी रासायनिक खतांचा वाढता प्रभाव शेतीला मरक ठरला. जमीनीची पोत नष्ट करण्यात रासायनिक खतांचा मोठा वाटा राहिला. परिणामी शेतीला समृध्दी आणण्यासाठी उत्पादन वाढ ही शाश्वत असणे गरजेचे आहे ही मागणी आता पुढे आली आहे. केवळ आज वाढीव उत्पादक घेऊन शेतीची उत्पादकता अधिक आहे असे म्हणने चुकीचे आहे. तंत्रज्ञान व विज्ञानाच्या मदतीने शेतीला समृध्दी देण्याचे काम मोठया प्रमाणावर सुरू आहे. तंत्रज्ञान व विज्ञानाच्या मदतीने तत्कालीन प्रश्नाच्या सोडणूकीसोबतच भविष्यकालीन उपाय योजनांचे देखील विचार करावा लागणार आहे. म्हणजेच शेतीला शाश्वत विकासाची जोड देणे गरजेचे आहे.

प्रसार माध्यमांचे योगदार्न

कृषी क्षेत्राच्या विकास हा शाश्वत पध्दतीने झाला पाहिजे तरच येर्णाया पिढीला कृषी क्षेत्रातील लाभ मिळणार. भारतीय अर्थव्यवस्था कृषीच्या शास्वतेवर अवलंबून आहे. शास्वत कृषी विकास संवादाच्या माध्यमातून ही अर्थव्यवस्था अधिक भक्कम व परिपूर्ण करता येईल. शेतर्कयांचे वाढते आत्महत्येचे प्रमाण थांबविणे आणि अन्नधान्याच्या वाढत्या किमती कमी करायच्या असतील तर कृषी संवाद सुयोग्य पध्दतीणे घडवून आणणे गरजेचे आहे. कृषी विस्तारात संवाद हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. शाश्वत कृषी विस्तारासाठी संवादशास्त्राची जोड अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. कृषी संशोधन व विस्तार या करिता कृषी विद्यापीठांची निर्मिती करण्यात आली. या विद्यापीठामधून दरवर्षी हजारो विद्यार्थी पदवी घेवून बाहेर पडतात. परंतु शिक्षणाचा दर्जा आणि कृषी संशोधन व कृषी विस्तार या कार्यक्रमात सुमारता असल्याने कृषी पदवीधर दुर्सया क्षेत्रात रोजगाराच्या संधी शोधताहेत. "कृषी संशोधनाच्या क्षेत्रात आपली सर्व उमेद घालविलेल्या बी. व्ही. निबंकर यांच्यामते कृषी विज्ञानाची पदवी घेतलेले **2** टक्के पदवीधर कृषीक्षेत्रात कार्यरत असतील"18 श्री. रमेश पाध्ये यांनी कृषी विकासात अडसर ठरलेल्या घटकांचा विचार मांडतांना नमुद केले की "भारतामध्ये कृषीक्षेत्रात राबर्णायांची संख्या आणि एकूण कार्यक्षम मनुष्यबाळातील तक्केवारी जागतीक पातळीवर सर्वात जास्त असली तरी या क्षेत्रासाठी संशोधन व त्याचा विस्तार कर्णायांची संख्या अत्यंत तूटपुंजी आहे."19 कृषी विकासातील महत्वाची अडसर म्हणजे राजकीय उदासिनता या संदर्भात दै. लोकमत मधील अग्रलेखात मांडण्यात आलेले विचार तेवढेच सुचक आहेत. "महाराष्ट्रातील राजकाराणाला उद्योगांची एलर्जी आहे. कोणताही उद्योग प्रकल्प वा धरण राज्यात येणार असेल तर कधी जमीनीचे कधी पुर्नवसनाचे तर कधी पर्यावरणाचे कारण पुढे करून ते कसे येणार नाही हे पाहण्याची अहमहमीकाच येथील राजकारणात सुरू होते. त्याच्या जोडीला विदेशातून पैसा मिळविर्णाया स्वदेशी स्वयंसेवी संस्था आणि त्यांचे सेवावृत्ती आंदोलकही रस्त्यावर येतात. परिणामी राज्याचा औद्योगीक विकास अडला आणि कृषी क्षेत्राच्या प्रगतीलाही खिळ बसली."20 कृषी संशोधन कृषी विस्तार आणि राजकीय उदासिनता ही कृषी विकासातील अडसर दूर करण्यासाठी सुयोग्य संवाद प्रतिमानाची मांडणी अत्यंत गरजेची आहे. प्रसार माध्यमांच्याद्वारे ते राबविणे तेवढेच महत्वपूर्ण ठरते.

"जागतिक बॅकेच्या **2002** च्या अहवालात म्हटले आहे The media can play an important role in development by development by affecting the incertives of marret participants, business, individuals or politicians and by influenceing the demand for institutional change. Information flows through the media effect peoples ideas moniter peoples actions and threrby cerate constituencies for change and institutional reform. बाजारपेठेतील गरजा आणि त्या अनुषंगाने होणारे बदल लक्षात घेऊन विकासाला नवी दिश देऊशकतात. लोकभावना विचारसारणी आणि कृतीवर प्रभाव टाकून संख्यात्मक जीवनात बदल घडवून आणण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. शेती हे असेच एक महत्तवाचे बदलते क्षेत्र आहे."21 कृषी विस्तार व संशोधन हा कार्यक्रम देशभर मोठया प्रमाणावर हाताळला जातो. मागील **50** वर्षात शेती क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आले आहेत. पारंपारिक पध्दतीने केली जाणारी शेती आता आधुनिक उपकरणे व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केली जात आहे. राज्याच्या बागायती क्षेत्रातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. सोबतच कृषी प्रक्रिया उद्योगाचाही विस्तार होत आहे. कृषी शिक्षण संशोधनाचाही व्याप वाढत आहे."22 शासनाच्या मुखपत्रात सर्वदूर आलबेल आहे असे नमुद करण्यात आले आहे. परिवर्तनाचा वाटसरू या मासिकात मात्र कृषी संशोधन व विस्तार या दांदर्भात **2010** मधील ऑक्टोबर महिन्यातील **11** व्या अंकात भारतभर व महाराष्ट्रात कृषी विकास संवादाच्या अंतराविषयी रमेश पाध्ये यांनी मांडणी केली. एवर्ट रॉजर्श या अभ्यासकाने Diffusion of Innovation हा कृषी विस्तार व संवादासंदर्भात ग्रंथ मांडलेला आहे. प्रा. केवळ जे कुमार रॉजर यांच्या ग्रंथाविषयी म्हणतात "Everett Rogers was a product of an lawa farm family trained in modern in modern agriculture his theorles have been proved more relevant to Asia than that America or Europe"23 रॉजर्श यांचे संशोधन आशिया खंडातील देशांना अधिक उपयुक्त आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

भारतीय कृषी विकासात स्थानिक संशोधनाचा व तंत्रज्ञानाचा वापर र्खया अर्थाने शाश्वत कृषी विकासाचा आधार ठरणार आहे. स्थानिक संशोधन व तंत्रज्ञान शेतर्कयांपर्यंत प्रत्यक्ष पोहचण्यासाठी व त्या विषयी जागृती आणि स्विकार वाढण्याकरिता प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची आहे. महाराष्ट्रात वर्तमानपत्रामध्ये जवळपास सर्वच दैनिके व मासिके कृषी संवादाकरीता कटीबध्द आल्याचे दिसून येते. सकाळ लोकमत दिव्यमराठी महाराष्ट्र टाईम्स लोकसत्ता गांवकरी देशोन्नती दै. भास्कर पुण्यनगरी देशदूत आदी स्थानीक व प्रादेशिक वृत्तपत्रे आठवडयातून एकदा कृषी संवादाकरिता आपले एक पान कृषीजागर शेतशिवार कृषोकोन्नती या स्वरूपाच्या नावाने प्रकाशित करताहेत. ॲग्रोवन कृष्कोन्नती ही तर दैनिक म्हणून महाराष्ट्रात शेती विस्तार व संवादाचे प्रभावीपणे कार्य करताहेत. दूरचित्रवाणी वाहिन्यांमध्ये सह्याद्री आमची माती आमची माणसं दूरदर्शनकृषीदर्शन स्टार माझा **712** श्तव मराठी झीं **24**तास या वाहिन्यांवर कृषी विषयक कार्यक्रमांची रेलचेल दिसून येते. आकाशवाणीवर माझं गाव माझं शिवार कृयीवाणी कृयीतरंग या नावाने उत्कृष्ट कार्यक्रम प्रसारित केले जातात.

महाराष्ट्राचा विचार करता वर्तमानपत्रे दूरचित्रवाणी व रोडिओ या माध्यमातून कृषी संवादाचे कार्य अधिक सजगतेने होत असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या प्रश्न याच माध्यमांनी उजागार केल्यामुळे शेतर्कयांना शासनाची मदत व मार्गदर्शन लाभू शकले आहे. शेती उत्पादनाला योग्य भाव बाजारपेठेचाप्रश्न या संदर्भात प्रसारमाध्यमातून वेळोवेळी बातम्या व लेखांच्या माध्यमातून मार्गदर्शक होत असल्याचे आपणास दिसते. दूरदर्शनवर स्वतंत्र कृषी वाहिनी सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहे.

प्रसारामध्ये कृषी संवादात विकास व विस्तार या कार्यक्रमास जास्त सहभोगी होत नाही हा आरोप त्यांच्यावर केला जातो. हे कूट सत्य आहे. वर्तमानपत्रांमध्ये ज्या प्रमाणात राजकिय कीडा मनोरंजन या विषयावरील बातम्या व वैचारिक लेखांना प्राधान्य दिले जाते. त्या तुलनेत कृषी विषयक माहितीचे वहन केले जात नाही. मार्च **2011** मध्ये जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग उमवितर्फे जळगाव शहरातील काही निवडक लोकांच्या प्रतिक्रिया मराठी वृत्तपत्रांचे कृषी विषयक धोरण या

संदर्भात घेण्यात आल्या . लोकमत सकाळ व देशोन्नती या तीन मराठी दैनिकासंदर्भात हा सर्वेक्षण अभ्यास करण्यात आला होता . त्यात 57 टक्के उत्तरदाते म्हणतात की मराठी दैनिकातून कृषी विषयक प्रश्न सोडविले जात नाही . तर 32 टक्के उत्तरदाते काही प्रमाणात सोडविले जात असल्याचे मत व्यक्त करतात . 11 टक्के उत्तरदात्यंनी कृषी विषयक प्रश्न सोडविले जात नसल्याचे म्हटले आहे . कृषीविषयक बातम्यांच्या स्वरूपाविषयी विचारणा केला असता 47 टक्के उत्तरदाते बातम्या संक्षिप्त स्वरूपात असल्याचे मत व्यक्त करतात . ठराविक पिकांसंदर्भात बातमी असल्याचे नमूद करतात तर 9 टक्के उत्तरदाते कृषीविषयक बातम्या या संमिश्र स्वरूपाच्या असतात असे म्हणतात . वृत्तपत्रातील माहिती प्रत्यक्ष शेती करतांना उपयोगी पडते काय अशी विचारणा केली असता 50 टक्के उत्तरदात्यांनी होय असे नमूद केले . तर 21 टक्के उत्तरदात्यांनी नाही आणि 29 टक्के उत्तरदात्यांनी काही प्रमाणात उपयोग होत असल्याचे मत दिले आहे . एकंदरीत वर्तमानपत्रातील कृषीविषयक मजकूर असून अडचण नसून खोळंबा अशा स्वरूपाचा असल्याचे वाचकांचे म्हणने आहे .

इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातील कृषीवियषक संदेशासंदर्भात अभ्यासकरता असे लक्षात येते की विशेषतः मराठी वाहिन्या या कृषीविषयक बातम्यांच्या संदर्भात अधिक प्रभावशाली दिसून येत नाही . साम टीव्ही ; 24 तास आयबीएन लोकमत व मी मराठी या वाहिन्यांवर कृषी संवादावर आधारित विशेष कार्यक्रम सप्ताहात सादर केले जात नाही . स्टार माझा या वृत्तीवाहिनीवर मात्र दररोज 20 मिनीटांचा '712 च्या बातम्या' या नावाखाली कृषी विषयक कार्यक्रम सकाळी व सायंकाळी प्रसारीत केला जातो . ई टी . व्ही . मराठी या वहिनीवर दररोज सकाळी 6 . 30 वाजता 30 मिनीटांचा अन्नदाता हा कार्यक्रम प्रसारीत केला जातो . तर सह्याद्री या वाहिनीवर सकाळी 5 . 30 वाजता आमची माती आमची माणसं हा 30 मिनीटांचा आणि सकाळी 6 . 05 वाजता कृषीदर्शन, कृषै वार्ता नावाचा 25 मिनीटांचा कार्यक्रम शेती व शेतकरी या विषयावर सादर केला जातो . दूरचित्रवाणीवरील कृषी संवादाची रचना बघता लक्षात येते की कृषी विषयाला मराठी वाहिन्या या अल्पप्रमाणात स्थान देतात . झ्या वाहिन्या कृषी विषयक कार्यक्रमाला स्थान देतात त्यांची प्रसारण व सादरीकरणाची वेळ अल्पप्रमाणात आहे .

मुद्रीत व इलेक्ट्रॉनिक माध्यमातील कृषी संवादाचा लेखा जोखा अभ्यासतांना दोन्ही ठिकाणी आशयाचे स्थान आहे . परंतु वारंवारिता व सादरीकरणात खुजेपणा दिसून येतो . परिणामी शाश्वत कृषी विकासाची संकल्पना व महत्व पाहिजे त्या प्रमाणात अधोरेखीत होत नाही . कृषी विकास संवाद या संकल्पना सर्व दूर पोहचवण्याकरिता माध्यमात स्वतंत्र कृषी पत्रकारिता विभाग असणे अत्यंत गरजेचे आहे . पी . साईनाथन सारख्या अट्टासू व ध्येयनिष्ठ पत्रकाराचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळणे तेवढेच गरजेच आहे . माध्यमातील वाढती स्पर्धा चंगळवादाला प्रोत्साहन देण्आरी ठरते . शेती सारखा मुख्य प्रश्नांना हिवाळी व दुर्सयासारख्या सणाप्रमाणे वेळीप्रसंगी महत्व देणे येथील प्रसारमाध्यमांचे दुर्भाग्य मानावे .

प्रसार माध्यमातून प्रगट आशय व सादरीकरणाची पध्दत काही अंशी बोजड स्वरूपाची आहे . शाश्वत कृषी संवादात फक्त प्रत्यक्ष राबणारी शेतकरी माहिती संपन्न होणे गरजेचे नाही तर शेतीवर आधारीत तो प्रत्येक घटक देखील या संदर्भात जागृत व सजग असणे तेवढेच गरजेचे आहे . प्रसारमाध्यमातील आशय हा असा दुहेरी घटकांकरीता निर्मित व सादर होणे आवश्यक आहे . कृषीज्ञानाची ही नव संकल्पना देशभर पोहचविणे रूजविणे व त्यात सतत नाविन्य ठेवण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे . आजचे प्रसार माध्यमांचे स्वरूप हे कृषीमाहिती प्रसारणाचे आहे . त्यात जनमानसांत व शेतर्कयांमध्ये कृषी शिक्षण व संशोधनवृत्ती वाढविण्याच्या अनुषंगाने माहितीचे वहन करणे गरजेचे आहे . सचित्र लेख व बातम्या मनोरंजनात्मक माहितीपट व नभोनाटय कसदार अभियनाच्या माध्यमातून व लेखातून सादरीकरण असे स्वरूप कृषी शिक्षणाचे प्रसारण करतांना माध्यमांनी स्विकारणे तेवढेच गरजेचे आहे .

निष्कर्ष

1 . कृषी शिक्षण विस्तार व संशोधन ही त्रिसुत्रे प्रसारमाध्यमातून जनमानसापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्नात वाढ होणे गरजेचे आहे .
2 . शाश्वत कृषी विकास संवाद या संकल्पनेत प्रत्यक्ष शेतीवर कार्य करणाया शेतर्कयांसोबत शेतीवर अवलंबून असलेल्या प्रत्येक घटकांचा देखील समावेश व्हावा .
3 . स्थानिक कृषी संशोधनाला चालना देण्यासाठी प्रसारमाध्यमाद्वारे जनजागृती होणे आवश्यक आहे .
4 . प्रसार माध्यमात प्रगट कृषी विषयक आशयाच्या सादरीकरणात बदल होणे गरजेचे आहे .
5 . कृषी पत्रकारितेच्या विकासाकरिता विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे .
6 . कृषी तंत्रज्ञान व विज्ञान प्रसार माध्यमातील साधकांना परिपूर्ण आकलन व्हावे या करीता विशेष तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणे महत्वाचे आहे .
7 . कृषीला शाश्वत विकासाची जोड लाभण्यासाठी प्रसारमाध्यमांद्वारे प्रभावी संवादाची गरज आहे .

सूचना ः

1 . प्रसारमाध्यमातील कृषी विषयक माहितीच्या सादरीकरणात बदल घडविण्यात यावा .
2 . पत्रकारांसाठी कृयी ज्ञानासंदर्भात विशेष तज्ज्ञाचे व्याख्यान आयोजित करावे .
3 . कृषी विषयक माहितीच्या वहनातील वारंवारिता वाढविणे गरजेचे आहे .
4 . कृषी तंत्रज्ञान व विज्ञानाच्या संकल्पना सर्वसामान्याला आकलन होण्यासाठी त्यात सोपेपणा आणावा .
5 . स्थानिक शेती संशोधकांना प्रोत्साहन व पाठबळ लाभावे या करीता प्रसार माध्यमांनी सहकार्य करावे .

संदर्भ ः

1 . आहुजा बी . एन ; छाबरा एस . एस ; डेव्हलपमेंट कम्युनिकेशन सुरजीत प्रकाशन दिल्ली प्रथम संस्करण पृष्ठ 21 .
2 . येवलेकर अनंत व जोशी भालचंद्र कृषी सहकार आणि अर्थकारण बातमीचे विविध कार्यक्षेत्रे ङ्घ 103 व्यवस्थापक ग्रंथनिर्मिती केंद्र य . च . म . मुक्त विद्यापीठ नाशिक पृष्ठ क . 72 .
3 . डॉ . पटेल गनी मराठी वृत्तपत्रांचा उदय व विकास ः एक शोध डॉ . गव्हाणे सुधीर माध्यम संशोधन पत्रिका जनसंवाद वृत्तपत्र विद्या विभाग डॉ . बा . आं . म . विद्यापीठ औरंगाबाद जाने 2008 पृ . 17 .
4 . डॉ . पटेल गनी . . . कित्ता पृ . 21 .
5 . डॉ . धारूरकर वि . ल ; विकास संवादाची नवी क्षितीजे चैतन्य प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती पृ . 93 .
6 . पाध्ये रमेश भारतीय शेती क्षेत्रातील स्थित्यंतरे आणि समस्या परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिक अंक . 11 आक्टोबर 2011 पृष्ठ 8 .
7 . कित्ता पृ . 9 .
8 . कित्ता पृ . 9 .

9 . डॉ . पोटदुखे गोळवलकर रमा जनसंवाद सिध्दांत आणि व्यवहार श्री . मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती पृ . क . 260 व 292 .
10 . डॉ . धारूरकर वि . ल . माध्यम दृष्टीक्षेप चैतन्य प्रकाश्अन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ . 153 .
11 . कित्ता पृ . 153 .
12 . पाध्ये रमेश . . . कित्ता पृ . 9 .
13 . देसाई दत्ता महाराष्ट्रक 50 ः विकासाची दिशा आणि पर्याय परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिक अंक 12 वा ऑक्टो 2010 पत्र . 7 .
14 . कुलकर्णी दिलीप वेगळया विकासाचे वाटाडे राजहंस प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती 2003 पृ 1213 .
15 . देसाई दत्ता . . . कित्ता पृ . 6 .
16 . यादव रामजी भारत में ग्रामीण विकास अर्जून पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली प्रथम संस्करण 2009 पृ . क . 71 .
17 . डॉ . भटकर सुधीर प्रा . निताळे विनोद डॉ . वडनेरे सोमनाथ माध्यमांचे अंतरंग प्रितम पब्लीकेशन जळगाव प्रथम आवृत्ती सप्टें . 2011 पृ . 59 .
18 . पाध्ये रमेश . . . कित्ता पृ . 10 .
19 . कित्ता पृ . 10 .
20 . संपादकीय दै . लोकमत दि . 3 जानेवारी 2012 पान नं . 6 .
21 . डॉ . धारूरकर वि . ल . जनसंवाद सिध्दांत चैतन्य प्रकाश्अन औरंगाबाद प्रथमावृत्ती 2008 पृ . 235 36 .
22 . डॉ . साबळे रामचंद्र 50 वर्षातील बदलती शेती लोकराज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्रात शासन मुंबई अंक 6 सप्टेंबर 2010 . पृ . 12 .
23 . कुमार केवल ज़े मास कम्युनिकेशन इन इंडिया जायको प्रकाशन दिल्ली पृ . क . 259 .